...निमंत्रण मिळत असून, तातडीने अशा वाहनचालकांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## पाळीव श्वान न आणण्याचे आवाहन

नाशिक : शहरातील नागरिकांमध्ये व्यायाम करण्याची तसेच वॉक करण्याची आवड निर्माण होत असली तरीही अनेक जॉगर्स आपले पाळीव श्वान थेट मैदानात उतरवत असल्याने इतर जॉगर्समध्ये भीतीचे वातावरण असून, या श्वानांच्या मलमूत्र विसर्जनामुळे आरोग्याचा प्रश्नदेखील गंभीर बनला आहे.




**नवजीवन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या वतीने आयोजित महारोजगार मेळाव्यात मार्गदर्शन करताना उद्योजक धनंजय बेळे. समवेत संस्थेचे अध्यक्ष विजया देशमुख, विश्वस्थ सुभाष देशमुख, राजेंद्र अहिरे, लातूरसिंग वर्मा आदी.**

### नामवंत कंपन्यांचा सहभाग : नवजीवन इन्स्टिट्यूटचा उपक्रम; २५० विद्यार्थ्यांची निवड

# महारोजगार मेळाव्याने युवकांना संधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**सिडको :** येथील नवजीवन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, अंब्रड उद्योग संघटना यांच्या वतीने आयोजित महारोजगार (जॉब फेअर) मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात औद्योगिक क्षेत्रातील नामवंत कंपन्यांनी सहभाग नोंदविला असून, यावेळी सुमारे ८५० बेरोजगारांनी मुलाखती दिल्याचे आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले.

येथील नवजीवन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या वतीने दरवर्षी जॉब फेअरचे आयोजन करण्यात येते. यंदाच्या वर्षीही या महारोजगार मेळाव्यास प्रतिसाद मिळाला. या महारोजगार मेळाव्याचे उद्‌घाटन अंबड उद्योग उत्पादन संघटेनेचे अध्यक्ष धनंजय बेळे यांच्या हस्ते करण्यात आले, तर उद्योजक सोनिया चंद्राणी, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे संतोष मंडलेचा नवजीवन संस्थेचे विश्वस्थ सुभाष देशमुख अध्यक्ष विजया देशमुख, महाविद्यालयाच्या संचालक डॉ. प्रिती कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना विश्वस्त सुभाष देशमुख यांनी सांगितले की आजच्या परिस्थितीला नाशिक शहर हे एक सुवर्ण संधीचे शहर म्हणून पाहिले जाते. प्रत्येकाला नाशिकमध्ये नोकरीची संधी हवी आहे आणि हेच ओळखून नाशिकमधील सर्वांनी एकत्रित करून तरुणांसाठी एक संधी उपलब्ध करून दिली. नवजीवन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट हे महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास कसा होईल व हे विद्यार्थी जागतिक स्थरावर कसे टिकेल यासाठी संस्था अविरतपणे प्रयत्न करीत असल्याचेही विश्वस्थ देशमुख यांनी सांगितले. उद्योजक धनंजय बेळे यांनी सांगितले की विद्यार्थ्यांनी चिकाटीने काम केल्यास नक्कीच यश संपादन होईल, असेही बेळे यांनी सांगितले. यावेळी उद्योजक राजेंद्र कोठावदे, आयमा अध्यक्ष राजेंद्र अहिरे, विरल ठक्कर तसेच मंगल पवार, अरुण भालेराव, अनिल शेळके, मंगेश यादव आदी उपस्थित होते. महेंद्र विंचूरकर यांनी आभार मानले.

### १२०० विद्यार्थ्यांचा सहभाग

- महारोजगार मेळाव्यात उद्योग क्षेत्रांतील जिंदाल, गॅब्रीयल, लियर, डब्यू.एन.एस., डेटा मॅटिक्स, जी-नेक्ट, बीग बझार, एच.डी.एफ.सी., ट्रेडर बझार आदींसह ५० पेक्षा जास्त कंपन्यांनी सहभाग नोंदविला. तसेच या महाराष्ट्रातून १२०० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला, यातील २५०पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची निवड करण्यात आल्याचे नवजीवन इन्स्टिट्यूटचे समन्वयक महेंद्र विंचूरकर यांनी सांगितले.

**Sakal 16th Jan 2018**